# एका क्वारंटाईनची कथा...

**- आरती पटवर्धन** (पुणे)



अमेरिका-The land of opportunities! गेल्या अनेक दशकांपासून, उच्च शिक्षणासाठी, चांगल्या करिअरसाठी, हजारो भारतीय मुले-मुली अमेरिकेकडे आकर्षित होत आली आहेत आमचा मुलगा विराजसुध्दा अमेरिकेत शिक्षणासाठी येऊन, आता कॅलिफोर्नियात स्थायिक झाला आहे. सहाजिकच मुलांना, नातवंडांना भेटायला आमच्यासारखे आई-वडील, वर्ष-दोन वर्षांनी अमेरिकेला येत असतात.

यंदाही आम्ही दोघांनी अमेरिका भेटीचा बेत केला. २०२० च्या जानेवारी महिन्याच्या मध्यात, सॅन फ्रान्सिस्कोच्या बे-एरियातील मिलपीटसमधे, विराजच्या घरी, मी येऊन दाखल झाले! माझ्या नवऱ्याने, डॉ. अजितने, त्याची कामं पुरी करून, मार्च महिन्यात यायचं, असं ठरलं होतं. पण चीनच्या वुहान भागात सुरू झालेल्या कुठल्याशा नव्याच रोगाच्या बातम्या यायला लागल्या. आणि एक दिवस, अचानक शाळा बंद झाल्या. पाठोपाठ ऑफिसेस बंद झाली. मग हॉटेल्स, मॉल्स, सगळं बंद झालं! हळूहळू सगळ्या विमानसेवा थंडावत गेल्या नि थांबल्या! आम्ही आमची तिकीटं रद्द केली. काही पैसे कापून का होईना, थोडे पैसे परत मिळाले.

Work from home सुरू झालं, शाळा ऑनलाईन करायचे प्रयत्न सुरू झाले! नव्या परिस्थितीतही काही दिवस 'नव्याची नवलाई' होती. रहदारी कमी, हवेतलं प्रदूषण कमी! Commute चा वेळ वाचला! घरूनही कामं करता येतात की! मग काही दिवस 'हवा स्वच्छ, पाणी स्वच्छ! झाडं -पक्षी -प्राणी...सगळा निसर्गच जणू मोकळा श्वास घेतोय्, पेट्रोल वाचतंय्, पैसे वाचतायत्...' अशा विविध विचारांनी आनंदही वाट!ला

थोड्या दिवसांनी मात्र लहान मुलं कंटाळली, मोठी माणसं वैतागली! काळजी घेत, आणि काळजी न करण्याचा प्रयत्न करत, सगळेच जण वाट बघत होते...हे कोरोना नावाचं सावट कधी हटतंय्, याची! अनेक देशांमधली अनेक माणसं, जगात ठिकठिकाणी अडकून पडली होती. एक दिवस कानावर आलं, की भारत सरकार 'मिशन वंदे भारत' नावाच्या अभियानांतर्गत, अशा अडकलेल्या, अडचणीत सापडलेल्या भारतीयांसाठी खास फ्लाईटस् पाठवणार आहे. मुलाच्या घरी तशी मजेत रहात असल्यामुळे मी 'अडचणीत सापडलेली भारतीय' नव्हते! आणखी काही आठवड्यांनी मात्र अनेक लोक या योजनेचा फायदा घेत असल्याचे समजले. मग मीसुध्दा तिकीट काढले! भारतात परतायला एअर इंडिया सोडून दुसरा पर्याय नव्हता. Air Indiaने या 'विशेष' परिस्थितीत, तिकिटाची किंमतही 'विशेष' आकारली, नेहमीपेक्षा बरीच जास्त! या फ्लाईटस्, थेट जाणाऱ्या होत्या. आमची फ्लाईट, SFO to Delhi अशी १६ तासांची फ्लाईट होती. SFO Airport वर दोन फॅार्म भरावे लागले. यांत नाव, पत्ता, पासपोर्ट नं., कुठली फ्लाईट इ. जुजबी माहिती होती. तसेच ताप नाही ना, हे infra red thermometer ने तपासले. कोरोनाचा संसर्ग टाळण्याच्या उद्देशाने विमानात कमीत कमी सेवा दिल्या गेल्या. प्रत्येकाच्या सीटवर फूड पॅकेट्स् ठेवलेली होती. यात दोन meals, काही snacks, पाण्याच्या दोन बाटल्या, फ़ेस मास्क, हेड मास्क आणि सॅनिटायजर पॅकेटस्. हवे तेंव्हा गरम किंवा गार पाणी मिळू शकलं, बाकी, No service! No screen, no head phones, no blankets or cushions, no tea- coffee! काही अडचण न येता फ्लाईट नियोजित वेळेत दिल्लीला पोहोचली.

विमानतळावर सोशल डिस्टन्सिंगचा प्रयत्न चांगला केला गेला. कस्टम्स, इमिग्रेशन इ. करून आपापलं सामान घेऊन सगळ्यांना जवळच्या एका इमारतीत पाठवलं. तिथे काही फॉर्म भरायचे होते. इथे मात्र सोशल डिस्टन्सिंग नावापुरतंच होतं! क्वारंटाईन होणार, हे माहीत होतं, पण दिल्लीमधील अधिकाऱ्यांनी सांगितले, की काही विशेष कारणाने जर घरी जाणे आवश्यक असेल तर तुम्ही पुण्यात (home town) जाऊन क्वारंटाईनमधे राहू शकता. ज्येष्ठ नागरिक असलेला, जुनी पाठदुखी असलेला, एकटा असलेला माझा नवरा, हे पुरेसं सबळ कारण होतं. शिवाय तसं नमूद करणारं डॉक्टरचं सर्टिफिकेट माझ्याकडे होतं. दिल्लीतल्या अधिकाऱ्यांकडून कागदपत्रावर सही-शिक्के घेऊन मी परत डोमेस्टिक टर्मिनलवर आले. सध्या दिल्लीतील सर्व फ्लाईट्स एकाच टर्मिनल मधून ये-जा करत असल्याने ते अंतर फार नव्हतं. मी फोनवरून पुण्याच्या फ्लाईटचे बुकिंग केले. एअर इंडियाच्या वेबसाईटवर उल्लेख होता, की माझ्यासारख्या 'वंदे भारत'ने येणाऱ्या प्रवाशांना आंतर्राष्ट्रीय प्रवासात जितके सामान न्यायची परवानगी आहे, तेवढे सामान, डोमेस्टिक प्रवासातही नेता येईल, अधिक रक्कम न भरता! पण प्रत्यक्षात" Indigo" च्या काऊंटरवर सांगण्यात आलं, 'ही व्यवस्था आमच्या एअरलाईनला लागू नाही. कदाचित एअर इंडियाला लागू असेल!' वाद-विवाद करण्यात अर्थ नव्हता, तेंव्हा एक मोठीशी रक्कम भरून पुढच्या प्रवासाला सज्ज झाले.

९० मिनिटांच्या फ्लाईटमधे पाण्याची बाटली आणि एक head mask एवढीच सर्व्हिस होती. काही अडचण न येता ठरल्या वेळेत पुण्याला पोहोचलो. वाटलं, आता घरी जाऊन १४ दिवस घरच्या घरी विलगीकरण (isolation) करायचं! पण तसं व्हायचं नव्हतं! इतक्या दूरचा प्रवास करून आलेला इंटरनॅशनल प्रवासी सहज ओळखू येतो. त्या भल्या मोठ्या बॅगा, ते दमले भागलेले चेहरे ...माझ्यासारख्या अजून काहींना एका बाजूला घेऊन 'कोणत्या हॅाटेलमधे क्वारंटाईन करायला चालेल, ते या यादीमधील नावे वाचून ठरवा.' असं सांगण्यात आलं.

'अहो, पण दिल्लीमध्ये तर आम्हाला home...' या माझ्या केविलवाण्या विरोधाला अर्थातच यश नाही आलं! नंतर त्या अधिकाऱ्यानं आम्हाला समजावलं...'मॅडम, इतक्या मोठ्या संख्येने येणाऱ्या प्रवाशांची सोय करणं दिल्लीतल्या सिस्टीमलाही अवघड जातंय. म्हणून शक्य आहे तेवढ्यांना त्यांच्या त्यांच्या गावी पाठवून दिले जातंय. पण क्वारंटाईन तर करायलाच हवे!'

सध्याच्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी, सरकारी यंत्रणेमार्फत, अनेक हॅाटेल्समधे किंवा काही हॅास्टेल्समधे राहण्याची व्यवस्था केलेली आहे. यासाठीचा खर्च, अर्थातच राहणाऱ्या व्यक्तीने स्वत: करायचा असतो. यासाठी ही हॅाटेल्स त्यांच्या नेहेमीच्या दरापेक्षा, थोड्या कमी दराने पैसे आकारतात. एक चांगलंसं हॅाटेल निवडून तिथे जाऊन पोहोचले. या हॅाटेलचा एक पूर्ण मजला, अशा क्वारंटाईनमधे राहणाऱ्यांसाठी राखून ठेवला होता. कोरोना संसर्ग टाळण्यासाठी, इथेही" no service"! फोनवरून ऑर्डर केलेले जेवण, नाश्ता,टॉवेल्स, लिनन बदलायचे असल्यास तेही दाराशी आणून दिले जात. मग "self-help"!

सात दिवसांनंतर पुन्हा एकदा, शारीरिक तापमान, काही फॉर्म भरणे, हॅाटेलचे बिल भरणे, आरोग्यखात्याच्या अधिकाऱ्याने दिलेला सल्ला समजून घेणे इ. गोष्टी करून घरच्या क्वारंटाईनसाठी घराकडे यायला निघाले!

हे वाचून हा अनुभव फार क्लेशकारक होता, असं कदाचित काहींना वाटेल. पण प्रत्यक्षात त्या अनुभवातून जाताना मात्र तसा विशेष त्रास झाला नव्हता. अनेकांना वाटलं होतं, की सात दिवस एकटी राहताना मी कंटाळेन. पण मी विचार केला, जेट लॅग घालवायची ही नामी संधी आहे! शिवाय, काहीही काम-धाम न करता, कसलाही disturbance नसलेला हा '5-star' आरामाचा काळ! आयुष्यात परत कधी असा अनुभव येणार? सात दिवस मी मजेत घालवले.

परंतु तरीही सध्याचा हा काळ आनंददायी अनुभवांचा नाही. सगळं जगच 'न भूतो न भविष्यति' अशा अनुभवातून जातंय्. ईश्वर करो आणि या विचित्र अनुभवाचा अंत लवकर होवो. 'सर्वेपि सुखिन: सन्तु, सर्वे सन्तु निरामय:'

**टीप:** वरील लेखातला माझा अनुभव जुलै महिन्यातला आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात माझी एक मैत्रीण न्यूयॅार्क-दिल्ली-पुणे असा प्रवास, युनायटेड एअरलाईन्स'ने करून आली. दुसरी एक मैत्रीण शिकागोहून आली. दोघींनाही 'युनायटेड एअरलाईन्स'ने चांगली सेवा मिळाली. या पुढच्या काळात असा प्रवास अधिकाधिक सुखकर व सुखरूप होवो, ही सदिच्छा!

***